महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : सीएमए-०४२१/सीआर-०१/२०२१/जाहिरात जाहिरात क्रमांक : ०८७/२०२२

## महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत एकूण **३७८** पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२२, शनिवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२२** रोजी महाराष्ट्रातील एकूण **सहा** जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल :-

**२**. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२.१ महसूल व वन विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **वनक्षेत्रपाल, गट-ब (एकूण १३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | -- | -- | -- | ३ | -- | २ | २ | १ | १० | ३ | १३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | २ | -- | १ | १ | १ | ६ | २ | ८ |
| (२) महिला | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | -- | ४ | १ | ५ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४)वनशास्त्र पदवी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| **२.२ कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **(१)उप संचालक, कृषि व इतर, गट-अ (एकूण ४९ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ८ | ३ | २ | १ | २ | १ | १० | १ | ५ | ३३ | १६ | ४९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ६ | २ | १ | १ | १ | १ | ७ | १ | ४ | २४ | १० | ३४ |
| (२) महिला | २ | १ | १ | -- | १ | -- | ३ | -- | १ | ९ | ५ | १४ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०२ पदे दिव्यांगांसाठी राखीव [ (१) ०१ पद -** अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **(२) ०१ पद -** कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing)] | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| **(२) तालुका कृषि अधिकारी व इतर, गट-ब (एकूण १०० पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ११ | १२ | ४ | २ | ३ | -- | २० | २ | १० | ६४ | ३६ | १०० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ७ | ७ | ३ | १ | २ | -- | १३ | १ | ७ | ४१ | २४ | ६५ |
| (२) महिला | ३ | ४ | १ | १ | १ | -- | ६ | १ | ३ | २० | १० | ३० |
| (३) खेळाडू | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | ३ | २ | ५ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०४ पदे दिव्यांगांसाठी राखीव [ (१) ०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision),**(२) ०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing) , **(३) ०१ पद -** अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) (४) **०१ पद** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व ] | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | **एकूण - ०१ पद** | | | | | | | | | | | |

https://www.freshersnow.com/

| (३) कृषि अधिकारी, कनिष्ठ व इतर, गट-ब, (एकूण ६५ पदे) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | -- | ९ | ५ | २ | ११ | ७ | ९ | ४ | ७ | ५४ | ११ | ६५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | -- | ६ | ३ | १ | ७ | ५ | ६ | ३ | ५ | ३६ | ७ | ४३ |
| (२) महिला | -- | ३ | २ | १ | ३ | २ | ३ | १ | २ | १७ | ३ | २० |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| (४) दिव्यांग | **एकूण ०३ पदे दिव्यांगांसाठी राखीव [ (१) ०१ पद -** अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision),**(२) ०१ पद -** कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing) , **(३) ०१ पद -** अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | **एकूण ०१ पद** | | | | | | | | | | | |
| **२.३ जल संपदा विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **(१) सहायक अभियंता,स्थापत्य, गट-ब, श्रेणी-२ (एकूण १०२ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २० | १ | ६ | ६ | २ | २ | -- | ३ | १० | ५० | ५२ | १०२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १३ | १ | ४ | ४ | १ | १ | -- | २ | ६ | ३२ | ३३ | ६५ |
| (२) महिला | ६ | -- | २ | २ | १ | १ | -- | १ | ३ | १६ | १६ | ३२ |
| (३) खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ | ५ |
| (४) दिव्यांग | **एकूण ४ पदे दिव्यांगांसाठी राखीव** [(१) **०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision , (२) **०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), (३) **०१ पद** - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy), (४) **०१ पद** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness), तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व ] | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | **एकूण - १ पद** | | | | | | | | | | | |
| **(२) सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, गट-ब, श्रेणी-२, (एकूण ४९ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ६ | १ | २ | १ | २ | २ | ८ | १ | ५ | २८ | २१ | ४९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ४ | १ | १ | १ | १ | १ | ६ | १ | ३ | १९ | १४ | ३३ |
| (२) महिला | २ | -- | १ | -- | १ | १ | २ | -- | २ | ९ | ६ | १५ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (४) दिव्यांग | **एकूण - २ पदे दिव्यांगांसाठी राखीव** [(१) ०१ पद - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), (२) ०१ पद - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

**३.** पूर्व परीक्षेच्या निकालाधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल .

**४.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**५. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**५.१** पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

**५.२** पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल. तसेच याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**५.३** पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

**५.४** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग व्यक्ती, अनाथ) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

**५.५** महिला, खेळाडू , दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.६** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**५.७** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

https://www.freshersnow.com/

**५.८** एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

**५.९** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**५.१०** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**५.११** अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५.१२** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.१३** अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**५.१४** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**५.१५** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

**५.१६** सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**५.१७ खेळाडू आरक्षण :-**

**५.१७.१** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.१७.२** प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

**५.१७.३** खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**५.१७.४** सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास पूर्व परीक्षेचा अर्ज नाकारण्यात येईल.

**५.१७.५** कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**५.१७.६** एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**५.१८ दिव्यांग आरक्षण :-**

**५.१८.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.१८.२** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या संवर्ग/पदांच्या बाबतीत खालीलप्रमाणे संबंधित संवर्गाची पदे दिव्यांगांकरीता सुनिश्चित करण्यात आली आहेत:-

| अ.क्र. | संवर्ग | शासन आदेश | दिव्यांगत्वाचा उपप्रकार |
|---|---|---|---|
| १ | **वनक्षेत्रपाल, गट-ब** | शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ | दिव्यांग उमेदवार पात्र नाहीत |
| २ | **उपसंचालक कृषि व इतर , गट-अ** | शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक: कृषिआ-२५१९/प्र.क्र.५३/१६-ए, दिनांक ०६ मे, २०२२ | (1) B, LV<br>(2) D, HH<br>(3) OA, OL, OAL, BL CP, LC, Dw, AAV<br>(4) ASD (M, Mod), ID, SLD, MI<br>(5) MD involving (1) To (4) above |
| ३ | **तालुका कृषि अधिकारी व इतर, गट-ब** | शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक: कृषिआ-२५१९/प्र.क्र.५३/१६-ए, दिनांक ०६ मे, २०२२ | (1) B, LV<br>(2) D, HH<br>(3) OA, OL, OAL, BL CP, LC, Dw, AAV<br>(4) ASD (M, Mod), ID, SLD, MI<br>(5) MD involving (1) To (4) above |
| ४ | **कृषि अधिकारी, कनिष्ठ व इतर, गट-ब** | शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक: कृषिआ-२५१९/प्र.क्र.५३/१६-ए, दिनांक ०६ मे, २०२२ | (1) B, LV<br>(2) D, HH<br>(3) OA, OL, OAL, BL CP, LC, Dw, AAV<br>(4) ASD (M, Mod), ID, SLD, MI<br>(5) MD involving (1) To (4) above |

https://www.freshersnow.com/

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **सहायक अभियंता, स्थापत्य, गट-ब, श्रेणी-२** | शासन निर्णय, जल संपदा विभाग क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.९९/आ(संनि), दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२१ | (1) D,HH<br>(2) OA,OL, CP, LC,Dw,AAV<br>(3) SLD, MI<br>(4) MD involving (1) to (3) |
| ६ | **सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, श्रेणी-२, गट-ब** | शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक: दिव्यांग २०18/प्र.क्र.99/आ(संनि), दिनांक : १५ जून, २०२१ | (1) ,HH<br>(2) OL, LC,Dw, AAV<br>(3) ASD (M),SLD, MI<br>(4) MD involving (1) to (3) above |

**५.१८.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**५.१८.४** दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.१८.५** दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**५.१८.६** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**५.१८.७** लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती

**५.१८.८** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**५.१९ अनाथ आरक्षण :-**

**५.१९.१** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**५.१९.२** अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल

**५.१९.३** अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**६. वेतनश्रेणी :-**

**६.१ सर्व संवर्गातील गट- अ करीता वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर,** S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते.

**६.२ तालुका कृषि अधिकारी, गट-ब करीता वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर,** S-१६ : ४४९००-१४२४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते.

**६.३ जाहिरातीमधील इतर सर्व गट- ब व कृषि अधिकारी, कनिष्ठ गट-ब या संवर्गांकरीता वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर,** S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते.

**७. पात्रता :-**

**७.१** भारतीय नागरिकत्व

**७.२ वयोमर्यादा :-**

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | |
| १ | **वनक्षेत्रपाल, गट-ब** | १ जानेवारी, २०२३ | २१ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र |
| २ | **कृषि अधिकारी, गट-अ** | १ जानेवारी, २०२३ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | **कृषि अधिकारी, गट-ब** | १ जानेवारी, २०२३ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ४ | **कृषि अधिकारी, गट-ब कनिष्ठ** | १ जानेवारी, २०२३ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ५ | **सहायक अभियंता, स्थापत्य, गट-ब, श्रेणी-२** | १ जानेवारी, २०२३ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ६ | **सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, श्रेणी-२, गट-ब** | १ जानेवारी, २०२३ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**७.३ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- क्रमांक:एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक ०१ मार्च, २०२० ते १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.**

**७.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

https://www.freshersnow.com/

**७.५ शैक्षणिक अर्हता :-**

**७.५.१ वनक्षेत्रपाल :-**

**(एक)** वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषिशास्त्र, कृषि अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा

**(दोन)** विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक.

**(तीन)** विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**(चार)** शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएसटी-०२/१५/प्र.क्र.४६/फ-४, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ नुसार इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलि कम्युनिकेशन अभियांत्रिकी तसेच संगणक विज्ञान व तंत्रज्ञान अभियांत्रिकी अशी अर्हता धारण करणारे उमेदवार वनक्षेत्रपाल पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

**(पाच)**शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक : एफएसटी-०९/१८/प्र.क्र.३६६/फ-४, दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार खालील विद्याशाखेतील पदवीधर उमेदवार पदवीमध्ये गणित विषय घेवून उत्तीर्ण झाले असल्यास व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत असल्यास वनक्षेत्रपाल संवर्ग/पदासाठी पात्र असतील :-

(१) BE/B.Tech. Automobile Engineering ,(२) BE/B.Tech. Power,(३) BE/B.Tech. Production,(४) BE/B.Tech. Metallurgy and Material,(५) BE/B.Tech. Textile,(६) BE- Information Technology,(७) BE- Instrumentation, (८) B.Sc.- Biotechnology, (९) B. Pharmacy, (१०) B.Tech. - Food Science

**(सहा)** वनक्षेत्रपाल संवर्गातील वनशास्त्र पदवी धारकांसाठी आरक्षित पदासाठी वनशास्त्र पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित आरक्षित प्रवर्गातील उपलब्ध अर्हताधारक उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पद भरण्यात येईल.

**७.५.२ महाराष्ट्र कृषिसेवा :-**

**(१)** मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्याच विद्याशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.

**(२)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय, कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : आकृवि-१२११/प्रक्र २०८/१५ए, दिनांक ७ सप्टेंबर, २०११ अन्वये खालील शैक्षणिक अर्हता बी.एसस्सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत :-

| | |
|---|---|
| (१) बी.एसस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान) | (२) बी.एसस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) |
| (३) बी.एसस्सी (गृह विज्ञान) | (४) बी.टेक (अन्नतंत्र) |
| (५) बी.एफ.एसस्सी. | (६) बी.एसस्सी. (उद्यानविद्या) |

**(३)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक: मकृप १०२१/प्र.क्र.६३/७अ, दिनांक २२ एप्रिल, २०२१ अन्वये बी. एससी (ऑनर्स) कृषि या पदवीशी समतुल्य ठरविण्यात आलेल्या खालील पदव्यांचा समावेश करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| (१) बी. एससी (ऑनर्स) उद्यानविद्या, | (२) बी. एससी (ऑनर्स) वनविद्या, |
| (३) बी. एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान, | (४) बी. एफ.एससी (मत्स्य विज्ञान), |
| (५) बी. टेक (कृषि अभियांत्रिकी), | (६) बी. टेक (अन्नतंत्रज्ञान), |
| (७) बी. टेक (जैवतंत्रज्ञान), | (८) बी. एससी. (एबीएम)/ बी. बी. एम (कृषि)/ बी. बी. ए.(कृषि)/ बी. एससी (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन |

**७.५.३ महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा :-**

**(एक)स्थापत्य अभियांत्रिकी :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

(अ) B.E./B.Tech(Civil and Water Management)

(ब) B.E./B.Tech (Civil and Environmental)

(क) B.E./B.Tech (Structural)

(ड) B.E./B.Tech (Construction Engineering / Technology)

**(दोन) विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी** :-

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठातील विद्युत अभियांत्रिकी किंवा विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी मधील पदवी.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता विद्युत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

(अ) B.E./B.Tech (Electrical and Power Engineering)

(ब) B.E./B.Tech (Electronics and Power Engineering)

(क) B.E./B.Tech (Power System Engineering)

(ड) B.E./B.Tech (Electrical and Electronics Engineering)

**७.५.४** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**७.५.५** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**७.५.६** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

https://www.freshersnow.com/

**७.६ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-**

मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

**७.७ शारीरिक मोजमापे/अर्हता :-**

**७.७.१ वनक्षेत्रपाल, गट-ब पदाकरीता :-**

| पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|
| **(अ) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार** | |
| उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १५० सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |
| **(ब)अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार** | |
| उंची –१५२.५ सें.मी.(अनवाणी)(कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी |
| **(क)दृष्टि** :- सुधारणेनंतर (After Correction) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) ६/६ असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा. | |
| **(ड)** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१६** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक. | |

**७.७.२** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. तसेच वैदयकीय चाचण्या घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास व वैदयकीय चाचणीमध्ये पात्र न ठरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**८. निवडप्रकिया :-**

**८.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**८.२**सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) वनक्षेत्रपाल, गट-ब राजपत्रित (सेवाप्रवेश) नियम, २०१४

(२) कृषि आयुक्तालयातील महाराष्ट्र कृषि सेवा (सेवाप्रवेश) नियम २०१०

(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा :-

**(एक)** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील सहायक अभियंता (स्थापत्य) श्रेणी-२(सेवाप्रवेश) नियम , १९९७,

**(दोन)** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील सहायक अभियंता, (विद्युत व यांत्रिकी), श्रेणी - २ सेवा प्रवेश नियम, २०१३

**९. परीक्षेचे टप्पे :—**

**९.१** विविध संवर्गाकरीता भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टप्प्यामध्ये राबविण्यात येईल :-

| अ.क्र. | संवर्ग | टप्पे | संयुक्त पूर्व परीक्षेचे गुण | मुख्य परीक्षेचे गुण | मुलाखतीचे गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र वनसेवा | संयुक्त पूर्व परीक्षा व स्वतंत्र मुख्य परीक्षा | २०० | ४०० | ५० |
| २ | महाराष्ट्र कृषिसेवा | | | ४०० | ५० |
| ३ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी | | | ४०० | ५० |
| ४ | महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी | | | ४०० | ५० |

**९.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करणा-या उमेदवारांना, शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र असल्यास ते वरीलपैकी एकपेक्षा जास्त संवर्गासाठी बसू इच्छितात किंवा कसे याबाबत विकल्प (Option) द्यावा लागेल.

**९.३** संबंधित संवर्गाच्या पदभरतीकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधीत संवर्ग भरतीच्या परीक्षेसाठी अर्ज समजण्यात येईल/येतील.

**९.४** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, संबंधित संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील गुणांच्या प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**९.५ मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**९.५.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**९.५.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**९.५.३** संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक संवर्ग/पदाच्या परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

**९.५.४** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता, मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

https://www.freshersnow.com/

**१०. संवर्ग/पदांचा पसंतीक्रम**:-

**(एक)** संबंधित परीक्षेधून एकापेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास (बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया)सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे मुलाखतीस उपस्थित सर्व उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाच्या संवर्ग/पदांचा पसंतीक्रम सादर करण्यासाठी ७ दिवसाचा कालावधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**(दोन)** संवर्गाचा/पदाचा पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) ज्या संवर्गाच्या परीक्षेमधून एकापेक्षा जास्त संवर्गाची आणि/अथवा विभागाची पदे भरावयाची आहेत, अशा संवर्गाच्या परीक्षेमधून अंतिम निवडीसाठी संवर्ग/पदाचा पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य राहील.

(२) पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(३) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(४) आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास संबंधित उमेदवाराचा अंतिम पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही .

(५) पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये शारीरिक पात्रता व शैक्षणिक अर्हतेच्या दाव्यांच्या आधारे संबंधित संवर्ग/पदासाठी उमेदवाराची पात्रता आजमावली जाईल.

(६) एखाद्या संवर्गासाठी विहित शारिरिक पात्रतेच्या व शैक्षणिक अर्हतेच्या अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या उमेदवारास संबंधित संवर्गासाठी पसंतीक्रम सादर करता येणार नाही.

(७) दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णयान्वये दिव्यांग उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित संवर्ग/पदासाठी विचार केला जाणार नाही. याबाबतचा तपशील जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिला जाईल.

**११. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**११.१** उमेदवारांकडून विहित पद्धतीने व विहित कालावधीत प्राप्त संवर्गाच्या/पदांच्या पसंतीक्रमाच्या आधारे तात्पुरती निवड यादी(Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**११.२** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया नसलेल्या परीक्षांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रचलित पद्धतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**११.३** तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out) ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ०७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**११.४** तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा[Data] लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**११.५** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता पदांचे “ पसंतीक्रम सादर करणे ” तसेच सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीप्रक्रियेकरीता “ भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे ” याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार कोणत्याही परिस्थितीमध्ये केला जाणार नाही.

**१२. पूर्व परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**१२.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**(एक)** आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

**(दोन)** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

**(तीन)** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**(चार)** जिल्हा केंद्र निवड करणे.

**१२.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

**(दोन)** खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ.क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे) | PDF | ५० | ५०० |
| २ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे) | PDF | ५० | ५०० |
| ३ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे) | PDF | ५० | ५०० |
| ४ | माजी सैनिक आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे) | PDF | ५० | ५०० |
| ५ | खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक अथवा अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

**(तीन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’ प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(चार)** खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**१२.३ सर्वसाधारण :-**

**(एक)** अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

**(दोन)** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**(तीन)** अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(चार)** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१२.४ जिल्हा केंद्र निवड :-**

**एक)** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**(दोन)** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

**(तीन)** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

https://www.freshersnow.com/

**(चार)** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**(पाच)** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**१२.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**१२.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :**

**(एक)** अमागास - **रु. ३९४/-**

**(दोन)** मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग - **रु. २९४/-**

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**१२.५.२** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

**१२.५.३** परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने :-**चलनाद्वारे

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

**१२.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**१२.५.५** विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१२.५.६ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी १४.०० ते<br>दिनांक २३ ऑक्टोबर, २०२२ रोजी २३:५९ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक २३ ऑक्टोबर, २०२२ रोजी २३:५९** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | **दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी २३:५९** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक **२८ ऑक्टोबर**, २०२२ रोजी<br>बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**१३. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**१३.१** लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या ' **लक्षणीय (Benchmark)दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१'** तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१३.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**१३.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**१३.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**१३.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

https://www.freshersnow.com/

**१३.६** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या " **दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना** " चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

**१४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**१४.१ वनक्षेत्रपाल पदाकरीता परिविक्षाधीन कालावधी व प्रशिक्षण :-**

**(एक)** वनक्षेत्रपाल पदाकरीता परिविक्षाधीन कालावधी ३ वर्षांचा असेल.

**(दोन)** वनक्षेत्रपाल पदावर नियुक्त उमेदवाराने केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविदयालयातील दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण तसेच प्रधान मुख्य वन संरक्षक किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी विहित केलेले दीड वर्षाचे क्षेत्रीय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे व विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**(तीन)** विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा उमेदवार सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**(चार)** विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपालांच्या नियुक्तीची परस्पर जेष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळवलेले गुण व प्रशिक्षण पाठयक्रमाच्या शेवटी घेण्यात येणा-या अंतिम परीक्षेत मिळविलेले गुण एकत्रित करुन निर्धारित केली जाईल.

**(पाच)** प्रशिक्षण कालावधीमध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराने विदयावेतन देण्यात येईल.

**(सहा). बंधपत्र :-**

(१) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीनंतर विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर पदावर किमान ७ वर्ष सेवा पूर्ण करावी लागेल.

(२) विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान ७ वर्ष कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास, प्रशिक्षणावरील खर्चासाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करावी लागेल.

(३) याबाबतची संबंधित बंधपत्रे उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहतील.

**१४.२** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**(एक)** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**(दोन)** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा .

**(तीन)** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा.

**(चार)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या-८, दिनांक २२ जून, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार परिवीक्षा धोरणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**१५. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१५.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशप्रमाणपत्र परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी डाऊनलोड केलेले मूळ प्रवेश प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**१५.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१५.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१५.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**१५.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१५.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१५.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे..

**१६. परीक्षेस प्रवेश**

**१६.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**१६.२** स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**१६.३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील " **उमेदवारांकरीता माहिती** " विभागातील " **सूचना** " अंतर्गत " **सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या सदराखालील " **परीक्षा योजना** " विभागातील " **महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा परीक्षा** " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१८.** सदर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : **३० सप्टेंबर, २०२२**

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

https://www.freshersnow.com/